श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

मार्च २०२३ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | शिवजयंती विशेषांक, पाने २४

# श्री शिवजयंती सोहळा, श्रीक्षेत्र डेरवण

## शिवराज्याभिषेक शक ३४९




*व्यासपीठावर : डावीकडून – श्री. सचिन कानिटकर, श्री. विकासराव वालावलकर, श्री. शरद पोंक्षे, प्रा. रूपाली अवचरे, डॉ. सुवर्णा पाटील, श्री. शशिकांतभाऊ सुतार*

श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीक्षेत्र डेरवण आयोजित श्रीशिवजयंती सोहळा फाल्गुन वद्य तृतीया, शक १९४४; शिवराज्याभिषेक शक ३४९; शुक्रवार, दि. १० मार्च २०२३ रोजी श्रीशिवसमर्थगड, श्रीक्षेत्र डेरवण येथे प्रतिवर्षाप्रमाणेच अत्यंत उत्साहाने साजरा झाला. सकाळी ९.०० वाजता सुरू झालेल्या या सोहळ्याचे अध्यक्षस्थान ख्यातनाम अभिनेते, व्याख्याते मा. शरद पोंक्षे यांनी भूषविले तर प्रमुख वक्त्या प्रा. रूपाली अवचरे या होत्या. मा. शशिकांतभाऊ सुतार, मा. प्रा. सचिन कानिटकर, ट्रस्टच्या आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनीही या वेळी उपस्थित राहून आपले विचार व्यक्त केले.

ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते शिवसमर्थ मंदिराच्या प्रांगणात ध्वजारोहण झाल्यावर ध्वजप्रार्थना-पठण झाले आणि शिवसमर्थगडाच्या भव्य सभागृहात सभेच्या कामकाजाला सुरुवात झाली. प्रथम इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यगीत – 'गर्जा महाराष्ट्र माझा' आपल्या जोषपूर्ण आवाजात सादर केल्यावर वे. मू. मंदार फडकेगुरुजी, वे. मू. मिलिंद बोरकरगुरुजी आणि ब्रह्मवृंदाने शांतिसूक्त पठण केले. सभेच्या सूत्रसंचालिका श्रीमती शरयू यशवंतराव यांनी प्रास्ताविक करून सभेचे अध्यक्ष आणि प्रमुख वक्त्या यांचा परिचय करून दिला आणि ट्रस्टतर्फे श्री. विकासराव वालावलकर यांनी शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. अन्य वक्ते मा. शशिकांतभाऊ सुतार, प्रा. सचिन कानिटकर, डॉ. सुवर्णा पाटील तसेच डेरवणच्या सरपंच मा. श्रीमती अक्षता मुंढेकर, माजी आमदार श्री. विनय नातू, शास्त्रज्ञ डॉ. संजीव कट्टी आणि अन्य मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या काही समाजसेवकांचा ट्रस्ट प्रतिवर्षी सत्कार करतो. आपल्या परिसरातील गोरगरीब रुग्णांना डेरवण रुग्णालयातील आरोग्यसेवेचा लाभ घेता यावा म्हणून त्यांना



*श्री. विकासराव वालावलकर, अध्यक्ष श्री. शरद पोंक्षे आणि प्रमुख वक्त्या प्रा. रूपाली अवचरे, प्रा. कानिटकर आदींचे सभस्थानी आगमन*

साहाय्य करणारे श्री. पांडुरंग पावसे (पाजपंढरी, ता. दापोली), ह.भ.प. संजय साळवी (तिवरे) आणि श्री. संजय घाणेकर (डेरवण) यांचा अध्यक्षांच्या हस्ते चांदीचा प्याला आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करून माध्यमिक शाळेत पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या डेरवण परिसरातील मुलींना प्रोत्साहन म्हणून दरवर्षी मनगटी घड्याळे बक्षीस दिली जातात. या वर्षी जि. प. शाळा, डेरवण नं. १ मधील चार विद्यार्थिनींना आणि जि. प. शाळा, हडकणीमधील चार विद्यार्थिनींना अध्यक्षांच्या हस्ते ही बक्षिसे देण्यात आली. यानंतर सभेच्या मुख्य कार्यक्रमाला, माननीय वक्त्यांच्या व्याख्यानांना प्रारंभ झाला.

सर्वप्रथम डॉ. सुवर्णा पाटील यांनी आपले चिंतन श्रोत्यांसमोर मांडले. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या, ''सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी स्वामी विवेकानंदांनी देशातील तरुणांना कर्मप्रवृत्त होण्याचे आवाहन केले होते. हाच विचार श्रीकाकामहाराज आज पुढे नेत आहेत. केवळ रुग्णालय चालविण्यापेक्षा, रोग होऊ नयेत म्हणून इथल्या लोकांच्या आरोग्य समस्यांच्या मुळाशी जाऊन, त्या समूळ नष्ट



*ध्वजपूजन करताना प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर*



*श्रीसहजानंदसरस्वती महाराज आणि भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहताना श्री. शरद पोंक्षे आणि मान्यवर पाहुणे*



*सूत्रसंचालिका सौ. शरयू यशवंतराव*

करणे हे अनोखे उद्दिष्ट समोर ठेवून ही संस्था संशोधनकार्य करीत आहे. त्यासाठी डॉ. अनिल काकोडकर, डॉ. रामास्वामी, डॉ. बी. रवी, डॉ. श्रीपाद बाणावली, डॉ. ऋता मुल्हेरकर अशा नामवंत संशोधकांचे मार्गदर्शन संस्थेला मिळत आहे.

कोकणात कुपोषण, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, कर्करोग या प्रमुख समस्या आहेत. कुपोषणाची सुरुवात मातेच्या गर्भात असतानाच होत आहे म्हणून प्लॅसेंटा (वार)विषयी सखोल संशोधन करण्यात येत आहे. तसेच सुमारे ४४००० मुलामुलींच्या वाढीविषयी नोंदी घेण्यात आल्या आहेत. कुपोषित मातांची आरोग्य तपासणी करण्यात आली. याचा निष्कर्ष एकच होता की कुपोषित माता कुपोषित बालकाला जन्म देते. देशाची भावी पिढी आरोग्याच्या समस्या घेऊनच जन्माला येते.

हे कुपोषण थांबविण्यासाठी, गरोदर मातांचे आरोग्य सुधारण्यासाठी जर प्रयत्न केले तर ते तहान लागल्यावर विहीर खणायला घेतल्यासारखे होईल, म्हणून रुग्णालयाने किशोरवयीन मुलींनाच सुदृढ करण्याच्या दृष्टीने आपले कार्य सुरू केले. सुमारे ६०,००० मुलींना आरोग्यपूर्ण होण्यासाठी रुग्णालयात आणून तपासण्या, उपचार आणि मार्गदर्शन, करण्यात आले.

या कामाचे महत्त्व आणि अनोखेपण लक्षात घेऊन प्रो. कॅरोलिन फॉल (Southampton University, U.K.) यांनी मेडिकल रिसर्च काउन्सिल, यु. के. यांच्याकडून आर्थिक साहाय्य मिळविले. एक जागतिक चर्चासत्र आयोजित करून एकंदर नऊ देशात किशोरवयीन मुलींसाठी एक मोठा कार्यक्रम सुरू झाला आहे.



*शांतिसूक्त पठण*



*महाराष्ट्र राज्यगीत गाताना इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी*

या संशोधनात निघालेला महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे मातेच्या कुपोषणामुळे गर्भात असताना गर्भाचे होणारे चुकीचे (फेटल) प्रोग्रॅमिंग आणि त्यामुळे भविष्यात उद्भवणारे मधुमेहासारखे गंभीर आजार. यावर मात करण्यासाठी पौष्टिक लाडूंबरोबरच मैद्याचा वापर न करता तयार करण्यात आलेली 'मॉर्निंग मिस्ट' ही कॅल्शियम आणि प्रोटिन्सयुक्त बिस्किटे रुग्णालयाने उपलब्ध करून दिली आहेत. यासाठी अनेक संस्था आणि व्यक्तींनी खूप मदत केली आहे.

'वात्सल्य ट्रस्ट' मुंबई यांच्या सहकार्याने तरुण पिढी स्वावलंबी व्हावी यासाठी अनेक व्यवसायाभिमुख शिक्षणक्रम सुरू करण्यात येत आहेत. पाठदुखीवर उपचार म्हणून डॉ. नाडकर्णी आणि डॉ. ऋता मुल्हेरकर यांनी मणक्याच्या चकत्यांवर करावयाची आधुनिक उपचार पद्धती संशोधित केली असून हा प्रकल्प The Biotechnology Industry Research Assistance Commission (BIRAC) यांच्या आर्थिक सहकार्यातून सुरू आहे.

यासाठी पेशींचे संवर्धन करणारी एक सुसज्ज प्रयोगशाळा (Cell culture Lab) सुरू करण्यात आली आहे. फणसाच्या आठळ्यांपासून Jacklin extract काढण्याची प्रमाणित प्रक्रिया तयार करण्याविषयीही संशोधन सुरू आहे. डॉ. नीलम शिरसाट या कॅन्सरचे ट्युमर तयार होण्यापूर्वीच त्याचे निदान व्हावे याविषयी संशोधन करीत आहेत.

खेडोपाडी मोठ्या पॅथॉलॉजिकल लॅब्स उपलब्ध नसतात त्यामुळे रोगनिदान लवकर होत नाही. म्हणून रुग्णालयाने 'Point of care test ' उपलब्ध होण्यासाठी 'Lateral flow immunoassay lab' स्थापन केली आहे.

या सर्व संशोधनाचे विषय हे शाश्वत विकास करणारे, प्रासंगिकता साधणारे, कार्यक्षमता वाढवणारे आणि प्रभावकारी आहेत.

येथे केवळ चरित्रं गायली जात नाहीत तर थोरांच्या चरित्रापासून स्फूर्ती घेऊन दुर्बल आणि वंचित समाजाच्या उत्थानासाठी हा संशोधनाचा वसा घेतलेला आहे.''

या नंतर मा. श्री. शशिकांतभाऊ सुतार यांनी आपले विचार लोकांसमोर मांडले. ते म्हणाले, ''छत्रपती श्री शिवाजीमहाराजांची जयंती आपण तिथीप्रमाणे साजरी करतो. लो. टिळकांनी पारतंत्र्याच्या काळात समाज संघटित व्हावा म्हणून हा उत्सव सुरू केला. आता स्वतंत्र भारतात राष्ट्रपुरुषांचे स्मरण करायचे ते कृतज्ञताबुद्धीने आणि तरुण पिढीवर राष्ट्रीय संस्कार व्हावेत म्हणून. प्रत्येक पिढीला इतिहासाच्या या शिदोरीचा उपयोग होत असतो.

श्री शिवाजीमहाराज हे आपल्या राष्ट्रीय इतिहासातील पूजनीय, गौरवचे आणि अभिमानाचे स्थान आहे. 'निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।।' आणि 'पुण्यवंत नितिवंत राजा' अशा शब्दांत समर्थ रामदासस्वामींनी त्यांचे समर्पक वर्णन केले आहे.

महाराजांचा स्वराज्यासाठीचा प्रयत्न हा दुसऱ्यांची राज्ये बळकावण्यासाठी नव्हता तर त्याला राष्ट्रीय उद्दिष्ट आणि नैतिक प्रेरणा होती. ते बहुतजनांना आधार देण्याचे काम होते.

हे राज्य व्हावे ही 'श्रीं'ची इच्छा आहे असा उदंड आत्मविश्वास त्यांच्यापाशी होता म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीतही त्यांचे राज्य टिकले. राजा हा स्वराज्याचा उपभोगशून्य राजा आहे असा आदर्श त्यांच्यापुढे होता. हा राजा जाणता होता, समयज्ञ होता, जनतेची जाण असणारा होता.



*प्रा. रूपाली अवचरे यांचा सत्कार*




*अध्यक्ष श्री. शरद पोंक्षे यांचा सत्कार करताना श्री. विकासराव वालावलकर*

त्या काळी मोगलांचे प्रचंड साम्राज्य होते. आदिलशाही होती. जंजिऱ्याचा सिद्धी होता, पोर्तुगीज होते, इंग्रज होते. या सर्वांना रणांगणात आव्हान देणे शक्य नव्हते. म्हणून सुरुवातीला महाराजांनी सत्तेचा आधारभूत प्रदेश निर्माण केला. ते स्वराज्य! त्या सत्तेने निर्माण केले ते पुढे सव्वाशे वर्षे टिकले. मराठ्यांच्या उत्तरेतील राजकीय शक्तीचे उगमस्थान हेच होते. भारतीय राजकारणातील शक्तिकेंद्र त्यामुळे उत्तरेतून दक्षिणेत सरकले.

हिंदुस्थानचे राजकारण बहुकेंद्री होते. त्याचा फायदा आपले स्वराज्य वाढविण्यासाठी केला पाहिजे असे त्यांचे राजकारण होते. धर्माचे राज्य म्हणजे धर्मवेडाचे राजकारण नव्हे. धर्मछळ न करता नीतिराज्य निर्माण करता येते हे महाराजांनी दाखवून दिले.

परंपरागत सरदार घराणी बादशहाच्या दरबारात होती म्हणून त्यांनी सर्वसामान्य लोकांमधून सैनिक आणि झुंजार सेनापती निर्माण केले. सर्व समाजच जेव्हा अन्यायाच्या प्रतिकारासाठी उभा राहतो तेव्हा त्या राज्याला कोणी पराभूत करू शकत नाही. रयतच राज्याचे रक्षण करते. म्हणून महाराजांच्या राजनीतीत रयतेला महत्त्व होते.

महाराजांची युद्ध व्यूहरचना कमीतकमी बळ वापरून शत्रूचे जास्तीत जास्त नुकसान करणारी होती. त्यांच्या लष्करी मोहिमांचा अभ्यास करण्यासारखा आहे. आपण असा विचार करतो की महाराजांचे जीवन हे वैयक्तिक साहसाचे आहे. पण त्यांच्या लष्करी योजनेत सैनिकी प्रतिभा आणि नियोजन होते. प्रतिकूल घडले तर काय करायचे याची योजनाही तयार असे. प्रसंगी माघार घ्यायचे धैर्य सेनापतीजवळ असावे लागते. ते त्यांच्याजवळ होते. म्हणूनच त्यांनी अंतिम विजय मिळविला.

असा अनासक्त राजयोगी केवळ हिंदुस्थानातच होऊ शकतो. याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे. स्वराज्य स्थापना ही इतिहासाला कलाटणी देणारी घटना होती. इतिहासातील नव्या प्रवाहाचा तो प्रारंभबिंदू होता. महाराजांनी त्या प्रवाहाला जन्म दिला म्हणून घराघरात महाराजांची पूजा होते.''



*श्री. संजय घाणेकर (डेरवण) यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार*



*ह.भ.प. संजय साळवी (तिवरे) यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार*



*श्री. पांडुरंग पावसे (पाजपांढरी, ता. दापोली) यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार*



*सातवी उत्तीर्ण मुलींना उत्तेजनार्थ मनगटी घड्याळे बक्षीस*

प्रा. कानिटकर आपल्या भाषणात म्हणाले, ''येथे आल्यावर तुम्हाला, मला एकच प्रश्न नेहमी पडतो की हे कार्य चालते कसे? आणि या मागचं सूत्र काय? येथले स्वयंसेवक अहोरात्र कष्ट करून थकत कसे नाहीत? औरंगझेबालाही प्रश्न पडला होता की शिवाजीचे मावळे थकत कसे नाहीत? त्याचे सूत्र उलगडण्याचा मी थोडासा प्रयत्न आज येथे करणार आहे. स्वराज्य संपविण्याच्या उद्देशाने आशिया खंडातील सर्वात बलाढ्य असा औरंगझेब आपल्या सर्व सरदारांसह चालून आला. त्याला तोंड देण्याएवढी शक्ती शिवाजीमहाराजांजवळ नव्हती. त्यानंतर संभाजीमहाराज नऊ वर्षं लढले, त्यांना हालहाल करून मारले. राजाराममहाराज जिंजीला गेले. रायगड पडला. सोन्याचे सिंहासन भंगले. अशा वेळी सर्वत्र मोगल सरदार पसरलेले असताना; आणि आदिलशाही, कुतुबशाही, जंजिरेकर सिद्धी, गोव्याचा पोर्तुगीज असे सगळे आपल्या विरुद्ध असताना, संताजी घोरपडे हा संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर जिंजीपासून नळदुर्गापर्यंत मोगलांना एवढा हादरवीत होता की घोडे पाणी प्यायले नाहीत तर विचारले जायचे की काय तुला पाण्यात धनाजी-संताजी दिसतात? सैन्य पोटावर चालते. यांच्याजवळ पैसा नव्हता. छत्रपती राजाराममहाराज स्वत:च जिंजीला गेलेले होते. औरंगझेब त्याला सामील होणाऱ्या सरदाराला भरपूर संपत्ती देत होता. पण ती प्रलोभने टाळून हे पंधरा ते वीस हजार सैनिक संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घालीत फिरत होते. हे कसे? त्याचे उत्तर मला भिडेगुरुजींनी दिले की देशासाठी, धर्मासाठी तळमळणारे हे आत्मे जळत असतात आणि त्यांच्या प्रकाशात तशी भक्ती असणारे हे सामान्य लोक मार्ग शोधित असतात. 'उरी ध्येयज्वाला असे पेटलेली । अशांच्या करी लागती ना मशाली ।। रवी नित्य तेवे विना तेल-वात । अशांची शिवाजी असे जन्मजात ।। 'हे शिवाजीजाती'तच जन्मलेले लोक असतात आणि तेच सगळे हे कार्य करीत असलेले दिसतात. दिगंबरदास महाराजांनी वालावलकरसाहेबांना घेऊन हा शिवसमर्थगड उभारला. आपण म्हटले असते की एवढे किल्ले असतांना आणखी एक किल्ला कशाला? आपण जमिनीवर उभे राहून पाहतो. सत्पुरुष हिमालयावर उभे राहून पाहतात. जेवढे वर जावे तेवढे क्षितीज विस्तारते. आज उभारलेलं स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, रिसर्च सेंटर, मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल त्यांना शिवसृष्टी उभारताना दिसत होतं आणि ते काकामहाराजांनी आपल्या भोवती साकार केलं आहे. हे कार्य असं उपयोगी पडेल की जगाच्या नकाशावर 'डेरवण' हे गाव येईल. हा चमत्कार आपण 'याची डोळा-याची देही' पाहात आहोत! आणि तोच चमत्कार छत्रपतींनी त्या काळी केला होता. महाराजांनी आज्ञा करावी आणि लोकांनी विचारावं, 'महाराज, घरावर तुळशीपत्र ठेवू का निखारा?' तुमचा-माझाच समाज होता. पण त्याचं मन उन्नत झालेलं होतं.

मी कार्यकर्त्यांना विचारतो की तुम्ही थकत कसे नाही? ते म्हणाले की घरच्या कामात दोन दिवसात थकतो, येथे आठ दिवस कसे जातात ते कळत नाही! हे जे उन्नयन आहे ते उत्तम नेतृत्वातून, साधनेतून आणि उपासनेतून घडतं. शिवाजीमहाराजांनी ते करून दाखविले.

असं घडलं की शिवाजीमहाराज पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकलेले असताना, कोल्हापूर भागातील आणि नव्यानेच आलेला शिवा काशीद, जातीने न्हावी, हा दिसायला थोडा महाराजांसारखा आहे, म्हणून त्याला महाराजांचे कपडे घालून पालखीत बसवून शत्रूला हुलकावणी देण्यात आली. शत्रूने पकडल्यावर तलवारीचे सपासप घाव पडले. पण त्याचा अंतरात्मा म्हणत असतो की मेलो तरी शिवाजीमहाराज बनून मेलो. हे आत्म्याचे उन्नयन!

त्याच वेळी महाराज आणि बाजीप्रभू आणि सोबत सहाशे मावळे! पावन खिंडीत पाठलाग करणारे शत्रूसैनिक जवळ आले तेव्हा बाजीप्रभू म्हणाले, 'महाराज, तीनशे मावळे घेऊन तुम्ही पुढे व्हा, मी खिंड अडवतो.' महाराज असे पुढे जाणारे नव्हते. अफझलखानाच्या अंगावर स्वत: गेले होते. शाइस्तेखानाच्या अंगावर स्वत: गेले होते. बाजीप्रभू म्हणाले, 'महाराज, लाख मेले तरी चालतील, लाखाचा पोशिंदा मरता कामा नये!' सामान्य माणूस



*डॉ. सुवर्णा पाटील – ट्रस्टच्या दमदार कामगिरीचा आढावा*

नैसर्गिक क्रिया म्हणून स्वत:चा जीव वाचविण्यासाठी धडपडतो. ही माणसं म्हणतात, महाराज वाचले पाहिजेत! घरचं लग्न सोडून तानाजी मालुसरे लढायला जातात. 'आधी लगीन कोंडाण्याचं आणि मग रायबाचं !' दक्षिण दिग्विजयाला जाताना शिवाजीमहाराजांनी त्या घराण्यातील लोकांना 'पारगड' हा चंदगड तालुक्यातील पार टोकाचा किल्ला दिला आणि सांगितले की चंद्र-सूर्य असेपर्यंत हा किल्ला सोडायचा नाही. आजही मालुसरे घराण्यातील लोक तेथे राहत आहेत.

इथेही असंच घडत आहे. वालावलकरसाहेबांना महाराजांनी सांगितलं की या कार्यासाठी लाख रुपये हवेत तर प्रसंगी कर्ज काढून त्यांनी पैसे उभे केले!

एकदा एका उत्सवाच्या वेळी थोरल्या महाराजांनी आज्ञा केली की आज आमरस करा. आंब्याचा सिझन नव्हता. प्रसादाला भक्तही भरपूर असतात. मग काय? बरेच भक्त बाहेर पडले आणि आमरसाचे भरपूर डबे घेऊन आले. सर्वांना यथेच्छ आमरस मिळाला. यामागील गूढ एकाने मला सांगितले की कोणा निकटच्या भक्ताच्या मनात असे आले की आत्ता सिझन नाही, पण आमरसाचे भोजन मिळाले तर फार मजा येईल. ती त्याची इच्छा पुरी करण्यासाठी महाराजांनी आमरस करण्याची आज्ञा केली होती. हा अनुभव प्रत्येकाला असतो की महाराज माझ्यासाठी काहीतरी करतात. आणि म्हणून आपला विचार न करता झोकून द्यावं अशी इच्छा प्रत्येकाला होते.

शिवाजीमहाराजांच्या आचरणाने मावळ्यांच्या मनात खात्री निर्माण झाली होती की आपण नाही गेलो तरी हा राजा बाहेर पडणार! म्हणून सगळे मावळे तलवारी उपसून बाहेर पडायचे. 'करवत-कानस कुणी चालवो, पिकवो कोणी शेतमळा । कलम कागदावरी चालवो, धरो कुणी हातात सुळा ।। करात कंकण असो कुणाच्या, वा भाळावर गंधटिळा । शिंग मनोऱ्यावरी वाजता, उभी छावणी घरोघरी ।। रणफंदीची जात आमुची, कोण आम्हां भयभीत करी ।।' असं कुसुमाग्रज म्हणतात.

लोक, रामायणकालीन, महाभारतकालीन लोक आपल्यासारखेच असतात. स्वार्थ जपतच असतात. पण जेव्हा असं नेतृत्व आणि असं कार्य समोर दिसतं, त्या वेळी त्यांची आपोआप उन्नती होत असते. आपली उन्नती होत असते म्हणून आपण या कार्यात येत असतो. ज्याला ती सदिच्छा आहे, धडपडून करावेसे वाटते तो करतो. रामायण काळातले वानर, कृष्णकाळातले गोप आणि शिवाजीमहाराजांच्या काळातले मावळे हे सगळे त्यांच्या मनाची उन्नती झाली आहे, आपल्या देहाचं सोनं त्यांनी त्या कार्यात करून घेतलं आहे म्हणून आपणाला ते पवित्र वाटतात. ते आपणाला इथे थोडंफार पाहायला मिळतं म्हणून आपण इथे येतो. देवाचं राज्य कसं असतं हे बघायला मिळतं. तुमच्यापाशी अपेक्षांचे हात येणार नाहीत. देणारेच हात तुम्हाला मिळतील. म्हणून तिवारींनी त्या वेळच्या वीरांचे वर्णन केलं ते सांगून थांबतो – 'औरंगपुराचे रूप बेरंग करूनी फिरती । दाभोळावर टोळासम वेगाने जाऊन पडती। सुरतेच्या सुरतीवरती जे हात फिरवुनी येती । गो, विप्रांचे ते वाली, विजयाचा टिळक कपाळी, लाऊन ज्या त्या वेळी । झटले जे देशाकरिता । एक काळ ऐसा होता । वेढिला पुरंदर किल्ला दिल्लीच्या दिलेरखाने। कोंढाणा कोंडुनी धरला जयसिंह समरवीराने । किल्ल्याचे तट लढताती उत्साहाने, शौर्याने । जरी शिरे तुटूनी पडती, तरी रायाची आज्ञा ती, रणी कबंध पाळीत असती । स्पृहणीय राजभक्तीचा, एक काळ ऐसा होता ।'

'जन्मभूमीसाठी सांगा जातील मृत्युच्या दारी । कुळकीर्तीसाठी सांगा होतील काळाचे वैरी । देशबंधूंसाठी सांगा करतील शेषावर स्वारी । समशेरी नाचविणारे, भाल्याला भुषविणारे, चापाला खेळविणारे । त्या शुरांचा तो दाता । एक काळ ऐसा होता ।' त्या दात्याची जयंती आपण साजरी करीत आहोत आणि गुण कसा दिला तर संतांसारखा दिला. संत म्हणजे 'आपणासारिखे करीती तात्काळ। नाही काळवेळ तया लागी ।।' संतांच्या सहवासात आलं की नकळत आपलं सोनं होऊन जातं. छत्रसालाने शिवाजीमहाराजांची भेट घेतली तेव्हा त्यांनी त्याचा स्वाभिमान जागृत करून मोगलांविरुद्ध लढण्यासाठी प्रवृत्त केले. समर्थ रामदास त्यांना वरदवंत म्हणतात. छत्रसालाने लढून आपले स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित केले....''

या नंतर प्रमुख वक्त्या प्रा. रूपालीताई अवचरे यांनी आपले विचार व्यक्त केले. त्या म्हणाल्या, '...कालपासून मी येथली वालावलकर ट्रस्टची माहिती घेत आहे. एक जबरदस्त काम इथे होत आहे. तेही सेवाभावी वृत्तीने! ग्रामीण भागात एक प्रेरणादायी आदर्श येथे ट्रस्टच्या रूपाने उभा आहे. या सर्व कार्याला, आयोजकांना प्रथम सलाम करते. येथल्या लोकांचे, गावाचे, पंचक्रोशीचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैचारिक उन्नयनाचे मोठे काम येथे करण्यात आले आहे. त्यामागच्या दूरदृष्टीलाही सलाम!



*'सुरुवातीला महाराजांनी सत्तेचा आधारभूत प्रदेश निर्माण केला. ते स्वराज्य!'*
*– श्री. शशिकांतभाऊ सुतार*



*'रणफंदीची जात आमुची, कोण आम्हां भयभीत करी ॥'*
*– प्रा. सचिन कानिटकर*

आज आपण शिवजयंतीनिमित्ताने येथे जमलो आहोत. शिवाजी हे केवळ नाव नाही; शिवाजी ही एक ठिणगी आहे, प्रत्येकाच्या मनात भडकण्यासाठी। शिवाजी हा एक ध्वज आहे, यश शिखरावर फडकण्यासाठी ! शिवराय म्हणजे एक ज्वाला आहेत, मनात अंगार फुलवणारे । शिवराय ही एक आग आहे, काळालाही झुकवणारी ! स्थापुनी हिंदवी स्वराज्य, शौर्याने लिहिली इतिहास गाथा । असा हा जाणता राजा, त्यांच्या चरणी झुकविते माथा !

साडेतीनशे वर्षे मुर्दाड पडलेल्या इथल्या तरुणांना शिवाजीमहाराजांनी प्रेरणा दिली. त्यांना आत्मशक्तीची, आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. प्रत्येकाच्या हृदयात स्वराज्याचे स्फुल्लिंग त्यांनी चेतवले. ज्याला भविष्यकाळ घडवायचा त्याला भूतकाळ माहीत असणे आवश्यक आहे. इतिहास माणसाला त्याच्या अस्तित्वाची, गतकाळातील वैभवाची जाणीव करून देत असतो. हिंदवी स्वराज्याच्या चैतन्यमयी इतिहासाचे रंग शिवरायांच्या कर्तृत्वातून, नेतृत्वातून रुजलेले आहे. आपल्यासमोर कर्तृत्व, नेतृत्व आणि दातृत्व याचा हा आदर्श आहे. भारतातच नव्हे तर जगातही शिवरायांच्या यशोगाथेची पारायणे केली जातात.

शिवाजीमहाराजांसाठी प्राण पणाला लावून लढणारे लोक कसे निर्माण झाले असतील? ते शोधण्यासाठी त्या वेळची परिस्थिती लक्षात घ्यावी लागेल. त्या वेळी मोगल, निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही वगैरे सत्तांनी गावोगाव वतनदारांना अधिकार दिलेले होते. कसेही करून सारा वसूल करणे आणि आवडलेली स्त्री उपभोगासाठी हरण करणे एवढेच ते करीत होते. जनता मुर्दाड झालेली होती. कोणी याविरुद्ध आवाज उठवत नव्हते. अशा परिस्थितीत शहाजीराजांना आपले एक स्वतंत्र राज्य असावे असे वाटले असेल आणि त्यांनी तीच भूमिका जिजाबाईंच्या मनात पेरली असेल. त्यामुळेच या दोघांच्या पोटी जन्मलेले शिवाजी, एका कणखर आईने, त्यांना असं घडवलं की स्वाभिमान त्यांच्या नसानसात चेतविला. जिजाबाईंनी आपल्या नातेवाइकांना दुसऱ्यांसाठी आपले रक्त सांडताना पाहिले होते. अगदी कोवळ्या वयातच त्यांनी स्वाभिमान आणि राम–कृष्णांच्या कथा शिवबांच्या मनावर बिंबविल्या आणि त्यामुळे कोवळ्या वयातच स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शिवबा सज्ज झाले. त्यांनी भूमिहीन शेतकऱ्यांना जमीन दिली. बी–बियाणे दिले. धान्यरूपाने जमलेला सारा गोरगरिबांना वाटला. कोणी उपाशी मरू नये म्हणून तरतूद केली. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्यांना कडक शासन केले. रांझ्याच्या पाटलांची हकिगत सर्वांना माहीत आहे. पण ती अर्धीच माहीत आहे. रांझ्याच्या पाटलाने चौकशीच्या वेळी क्षमायाचना केली त्या वेळी शिवाजीमहाराजांनी त्याला सांगितले की जर त्या मुलीने तुला क्षमा केली तरच मी तुला माफी देईन. यामुळे जिजाबाईंचीसुद्धा शिवाजीमहाराजांच्या न्यायनिवाड्याविषयी खात्री पटली कारण मुलीने आधीच आत्महत्या केली होती! राजा असा न्यायप्रिय, कर्तव्यकठोर असल्यामुळे सगळे मावळे त्यांच्यासाठी प्राणपणाने लढायला तयार झाले.

शिवरायांचे आयुष्य लढाया, संघर्ष यात गेले. या लढाया रणात होण्याआधी मनात होत होत्या. अफझलखानाच्या भेटीच्या वेळी नुकतेच पत्नीचे निधन झालेले होते. लहानग्या संभाजीराजांना मातोश्री जिजाबाईंच्या हवाली करून अफझलखानाला भेटायला जाताना त्यांच्या मनावर केवढा ताण असेल याची आपण कल्पना करू शकतो. त्यांच्या प्रत्येक कृतीमध्ये, उक्तीमध्ये आपणाला एक आदर्श लपलेला दिसतो.

अफजलखानाचा वध, शाइस्तेखानाची फजिती, आग्र्याहून सुटका अशा काही ठळक गोष्टी आपण नेहमी ऐकतो. पण त्यांचे संपूर्ण चरित्र विचारात घेतले तर त्यांचे अनेक गुण समोर येतात. त्यांची अपार बुद्धिमत्ता, चिकित्सा, ध्येयनिष्ठा, न्यायनिपुणता, नियोजनबद्ध हालचाली. सुरतेवरील हल्ल्याचे सहा महिने आधीपासून नियोजन सुरू होते. सुरतेची संपूर्ण माहिती मिळवली होती. आपण कोठे



*'महाराजांचे चरित्र म्हणजे एक कॅलिओडोस्कोप आहे.'*
*- प्रा. रूपाली अवचरे*

जात आहोत याचा पत्ता लागू न देता ते अचानक सुरतेला पोहोचले तेव्हा या बातमीवर सुरतचा सरदार इनायतखान विश्वास ठेवेना. मधला दीडशे कोसांचा मोगली मुलुख पार करून महाराज सुरतेला कसे पोहोचू शकतील असे त्याला वाटले. पण महाराजांचा खलिता मिळताच त्याला घाम फुटला. त्याने आपला एक दूत महाराजांकडे पाठविला. त्याने अचानक महाराजांवर हल्ला केला पण महाराजांच्या सेवकांनी त्याचा हात वरच्यावर छाटून टाकला. महाराज आणि त्यांचे मावळे प्रत्येक लढाई प्राणांची बाजी लाऊन लढत होते.

महाराज 'नारीरक्षक' होते. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला त्यांनी सन्मानाने परत पाठविले. प्रत्येक परस्त्रीला ते मातेसमान मानीत. अफझलखानाच्या भेटीच्या वेळी त्यांचा सावधपणा दिसतो. त्याचप्रमाणे जिद्द, जोष, स्मरणशक्ती, उत्साह, सकारात्मक वृत्ती असे अनेक गुण आपणाला दिसतात. आजच्या तरुण पिढीला त्यांचे अनेक गुण घेता येतील.

आपल्या आईला सती जाण्यापासून परावृत्त करणारे शिवाजीमहाराज एक सामाजिक क्रांतीचे अग्रणी होते. रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये असा आदेश त्यांनी आपल्या सैनिकांना दिला होता. घोडेस्वार सैनिकांनी पिकांमधून जाऊन पिकांची नासाडी करू नये असा त्यांचा सक्त आदेश होता.

असे ते लोकप्रतिपालक होते. जमिनीची मोजणी करण्याची पद्धत त्यांनी घालून दिली. ते उत्तम प्रशासक होते. विनाकारण झाडे तोडल्यास नवीन झाडे लावण्याची शिक्षा देणारे ते पर्यावरणरक्षक होते.

आज्ञापत्रातील एका पत्रात ते सांगतात की आरमारी जहाजे बांधताना सागवानी लाकूड वापरा. रयतेने मुलासारखी वाढविलेली आंबा, फणस अशी झाडे तोडू नका. ज्या काळात हिंदुधर्मीयांना समुद्रप्रवासाला बंदी होती, त्या काळात त्यांनी आरमार उभं केलं आणि धर्मापेक्षाही देश मोठा आहे हे दाखवून दिलं. पोर्तुगीज, डच, इंग्रज हे समुद्रमार्गे येत आहेत म्हणून त्यांनी दूरदृष्टीने आरमाराची उभारणी केली. मुहूर्त न पाहता, अगदी अमावास्येलाही लढाया करून, त्या जिंकून त्यांनी अंधश्रद्धेचे निर्मूलन केले.

सर्व गडकिल्ल्यांवर त्यांनी केलेली पाण्याची व्यवस्था त्यांची कल्पकता दाखविते. त्या काळी राज्यकारभार फारशीतून चालायचा. महाराजांनी रयतेच्या भाषेत म्हणजे मराठीत कारभार सुरू केला. शंभराहून अधिक गड त्यांनी बांधलेले आहेत. म्हणजे ते बांधकामतज्ज्ञही होते.

सर्व जातीधर्मांना समान न्याय देऊन त्यांनी एक सामाजिक क्रांतीचा पाया रचलेला आहे. कोणत्याही जातीधर्माला त्यांचा विरोध नव्हता. त्यांचा विरोध हा प्रवृत्तीला असे. अगदी जवळचा माणूस असेल तरी त्याने अन्याय केला तर त्याला त्यांनी शिक्षा दिलेली आहे.

यादवाडचा किल्ला सावित्री देसाई या महिला किल्लेदाराने सत्तावीस दिवस लढविला आणि मग ती पराभूत झाली. त्या वेळी तेथे लूट करणाऱ्या आपल्या सरदाराला महाराजांनी जबरदस्त शिक्षा करून आपण प्रजेला लेकीबाळींसारखे, मुलासारखे जपणारे आहोत हे दाखवून दिले आणि म्हणूनच मावळे महाराजांसाठी प्राणापणाने लढत होते.

लाचखोरी आज मोठ्या प्रमाणात आहे. ती त्या वेळीही काही प्रमाणात होती. पण याबाबतीत महाराजांनी आपला सावत्र मामा, सुपे परगण्यातला, त्यालाही शिक्षा केली आहे. महाराजांचे चरित्र म्हणजे एक कॅलिओडोस्कोप आहे. त्यातून अनेक रंग पाहायला मिळतात.

शिवाजीमहाराजांचा प्रभाव केवळ महाराष्ट्रावरच नव्हे, केवळ भारतावर नव्हे तर साऱ्या जगावर आहे. आजही कर्नाटकात महाराजांना फार मानले जाते. बंगालमध्ये रविंद्रनाथ टागोरांनी महाराजांवर 'उत्सव' हे काव्य लिहिले आहे. ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी मुखोद्गत केले होते. नेताजी जेव्हा आपल्या पुणे भेटीत सिंहगडावर गेले होते तेथे त्याचे त्यांनी पठण केले होते. शिवरायांनी पेरलेली स्वराज्याची बीजे संभाजीमहाराज, राजाराममहाराज, मावळे यांच्याद्वारे पुढे गेली. म्हणजे शिवाजीमहाराज हे एका काळापुरते मर्यादित नव्हते.

मी २०१६ साली लेह-लडाखमधील तुर्तुक नावाच्या सीमेवरील गावात गेले होते. तेथे शिवाजीमहाराजांची राजमुद्रा आणि प्रतिमा एका भिंतीवर कोरलेली आहे. शिवाजीमहाराजांचे चरित्र तेथे आदर्श म्हणून पठण केले जाते. अनेक विद्यापीठात आज महाराजांचे चरित्र अभ्यासले जात आहे. त्यांच्यावर अनेक पोवाडे रचिले गेले आहेत. त्यांचे विचार केवळ ऐकण्याचे नाहीत तर आत्मसात करण्याचे आहेत. ते काळजावर कोरायला हवेत. आज राज्यकर्त्यांना लोकांच्या सुखदुःखाशी काही देणे-घेणे नाही. मुलगी बापावर विश्वास ठेवू शकत नाही अशी परिस्थिती आज आली आहे. एक कविता आहे- 'अंधार खूप झाला, एक दिवा पाहिजे।



*'पृथ्वीतलावर मनुष्यप्राणी जन्माला आला त्या क्षणी हिंदुधर्माची स्थापना झाली.'*
*– श्री. शरद पोंक्षे*

पुन्हा एकदा जिजाऊंचा शिवा पाहिजे ।' खरं तर शिवराय आता पुन्हा येणार नाहीत, पण आपल्या मनामनात शिवराय जिवंत ठेवले, आपल्या कार्यातून दाखविले तर येथल्या मातीतून नवीन शिवराय तयार होतील! शिवराय जन्माला येण्याची वाट न पाहता, त्यांचे विचार आत्मसात करा, काळजावर कोरा, एक नवा इतिहास घडवा, एक उज्ज्वल भारत घडवा. ..धन्यवाद !''

या नंतर समारंभाचे अध्यक्ष, श्री. शरद पोंक्षे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, '...आज शिवजयंती आहे. अतिशय सुंदर अशी ही वास्तू आहे. आधीच्या वक्त्यांनी शिवाजीमहाराजांच्या माहात्म्याविषयी बरेच सांगितले आहे. आता काळ शिवाजीमहाराजांचा राहिलेला नाही. अशा कार्यक्रमाला आता कोणी घोड्यावर बसून येत नाही. आता आपल्यापैकी कोणी गडांवर राहत नाही. संपूर्ण काळ बदलला आहे. चार-साडेचारशे वर्षं होऊन गेली आहेत. कॉम्प्युटरचं युग आलं आहे. ना मोंगलांचे राज्य आहे, ना कुतुबशाही आहे, ना निजामशाही! त्यातलं आता काहीच राहिलेलं नाही. त्यामुळे अशी महापुरुषांविषयीची व्याख्यानं ऐकल्यावर जाताना प्रश्न पडतो की २०२३ मध्ये मी काय करायचं? शिवाजीमहाराज असे होते, संभाजीमहाराज असे होते, गांधीजी असे होते, सावरकर असे होते, .. हे सगळं त्या काळात घडलं.

आपण सगळे स्वातंत्र्यात जन्मलो. आपल्याला पारतंत्र्य माहीत नाही, आपल्याला गुलामगिरी माहीत नाही. हा सगळा आपला इतिहास आहे, हा सगळा आपला भूतकाळ आहे. पण इतिहास माहीत असणं फार गरजेचं आहे. भूतकाळ माहीत असणं फार गरजेचं आहे. कारण भूतकाळ माहीत नसेल तर भविष्यात काय करायचं ते ठरविता येत नाही. जे देश इतिहास विसरतात त्यांचा भूगोल बिघडतो. आम्ही इतिहास विसरलो आणि आमचा भूगोल बिघडत गेला. ८० ते ८५ दशलक्ष चौरस मीटर्स अशी आपल्या हिंदुस्थानची भूमी होती. ती आता ३२-३४ दशलक्ष चौरस मीटर्सवर आलेली आहे. म्हणजे जवळजवळ ६० टक्के जमीन आम्ही गमावून बसलो आहोत. मुसलमानशाह्यांच्या आक्रमणाच्या आधीपासून आपल्या देशावर आक्रमणे होत आहेत. सहाव्या-सातव्या शतकापासून आक्रमणे होत आहेत. पाच मुसलमान शाह्या नंतरच्या, आधी हुणांचं, शकांचं, ग्रीकांचं आक्रमण झालं. मग अकराव्या-बाराव्या शतकात मुसलमान शाह्यांच्या आक्रमणाला सुरुवात झाली.

प्रश्न असा आहे की सातत्याने याच भूमीवर आक्रमणे का? शिवाजीला 'सेक्युलर' दाखविण्याचा फार मोठा उद्योग सुरू आहे. मुळात सेक्युलॅरिझम- सर्वधर्मसमभाव, आणि हिंदुइझम- हिंदुत्ववाद हा समजावून घेतला पाहिजे. शिवाजी हा ... मी सातत्याने शिवाजी असेच म्हणणार आहे, कारण प्रत्येक वेळेला छत्रपती शिवाजीमहाराज म्हणण्याचे कारण नाही, कारण शिवाजी माझ्या हृदयामध्ये सर्वोच्च स्थानावर आहे. हे हल्ली नवीन फॅड निघालंय, शिवाजी म्हणायचं नाही, प्रत्येक वेळी छत्रपती शिवाजीमहाराज म्हणायचं! हे हल्ली ब्रिगेडी लोक आलेत ना, त्यांनी हा खुळचट प्रकार सुरू केलेला आहे. मी त्याला अजिबात किंमत देत नाही. मी माझ्या आईला कधी अहो आईसाहेब म्हणत नाही, आईच म्हणतो. लता मंगेशकर नव्वदीच्या पुढे जाऊन वारल्या. त्या भारतरत्न होत्या. साऱ्या जगाला त्यांनी आपल्या स्वरांनी आनंद दिला. प्रत्येक वेळेला आम्ही 'भारतरत्न लता मंगेशकर काय सुंदर गातात!' असं म्हणत नाही. लताचा आवाज ऐकला की पटकन तोंडून येतं, 'काय लता गाते, नाही?' मी तिचा एकेरी उल्लेख करतो तेव्हा तो अनादर नसतो, ते नितांत प्रेम असतं.

शिवाजी हा सेक्युलर होता की नाही हे समजून घेण्यासाठी मुळात हिंदुधर्म समजून घेणे आवश्यक आहे. शिवाजी हा हिंदुधर्मात जन्माला आला म्हणून तो सेक्युलर आहे. शिवाजी मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्मात जन्माला आला असता तर तो सेक्युलर असताच कामा नये. कारण इस्लाम, ख्रिस्ती धर्म कधी सेक्युलर असूच शकत नाही. मुळात, सेक्युलॅरिझम म्हणजे काय हेही समजून घेण्याची फार गरज आहे. शिवाजी कुठल्याही धर्माचा अनादर करत नव्हता, कारण तो हिंदू होता. तो हिंदू धर्मात, हिंदू संस्कृतीत जन्माला आला म्हणून तो सुसंस्कृत होता. तो हिंदू संस्कृतीत जन्माला आला त्यामुळे त्याच्या आईने त्याच्यावर दोन 'श्री'चे संस्कार केले. का शिवाजी मोठा? का विज्ञाननिष्ठ सावरकर 'जय देव जय देव जयशिवराया। या या अनन्यशरणा आर्यांच्या राया ।।' अशी आरती करतात? 'हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा ।' अशी नृसिंहाची उपमा का देतात? काय आहे शिवाजी? मुळात शिवाजी इतका चांगला का? इतका सज्जन का? इतका सुसंस्कृत का? कारण तो हिंदू आहे!

शिवाजी जन्माला येण्याआधी, जिजाबाई जन्माला येण्याआधी, शहाजीराजे जन्माला येण्याआधी हिंदुधर्म जन्माला आलाय! पृथ्वीतलावर मनुष्यप्राणी जन्माला आला त्या क्षणी हिंदुधर्माची स्थापना झाली. 'वसुधैवकुटुंबकम्' मानणारा एकच धर्म, मुळात धर्म एकच, हिंदुधर्म! म्हणून हिंदुधर्म समजून घेण्याची गरज आहे. मग त्या धर्मात जन्मलेला शिवाजी तुम्हाला कळायला लागेल! मग शिवाजीची सूत्रे तुम्हाला समजायला लागतील. साध्या दोन सूत्रावर जगलाय हा माणूस!

हिंदूधर्मामध्ये जन्मलेला माणूस सज्जन का असतो हे समजून घेणं फार महत्त्वाचं आहे. हिंदू असणारा माणूस इतका सज्जन का असतो? असं काय आहे हिंदुधर्मात? हिंदू या शब्दाची व्याप्ती, हिंदू या शब्दाची उत्पत्ती, कुठून आलं हे? मुळात धर्म म्हणजे काय? हे सगळं समजून घेतलं की मग या धर्मात जन्मलेला प्रत्येक नरवीर मग तो शिवाजी असेल, संभाजी असेल, बाजीराव पेशवा असेल, तात्या टोपे असेल, झाशीची राणी असेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर असतील, फुले असतील, गांधी असतील, सावरकर असतील, जे जे हिंदूधर्मात जन्माला आले ते सगळे कसे सुसंस्कृत निघाले? याच धर्मात जन्मलेली सगळी माणसे सुसंस्कृत का असतात? सज्जन का असतात? दुसऱ्यांचा आदर करणारी का असतात? या सगळ्यांचं मूळ आहे हिंदुधर्म. हिंदुधर्माच्याही आधी, धर्म! म्हणून आधी धर्म म्हणजे काय हे समजून घेतलं तर २०२३ सालात मला काय करायचं आहे हे समजून घेता येईल.

'गर्वसे कहो हम हिंदू है!' हे स्टीकर आता घरोघरी चिकटवले जातील कारण आता २४ साली निवडणुका येत आहेत. रात्री कोणीतरी हे आपल्या घरावर चिकटवून जाईल आणि वाचल्यावर आपणाला क्षणभर खरोखरच गर्व वाटेल ! पण आपल्याला गर्व का वाटतो ते शोधण्याची गरज वाटत नाही. आम्हाला काही वाचावंसं वाटत नाही! आम्हाला काही समजून घ्यावं, असं वाटत नाही! आम्ही काही वाचत नाही. विचार करीत नाही. ज्ञानी होण्याचा प्रयत्न करीत नाही. म्हणून हिंदुधर्माला सातत्याने टार्गेट केलं जातं. तुमची निंदानालस्ती केली जाते. तुमच्या सर्व महापुरुषांवर गलिच्छ आरोप केले जातात. त्यांची अशी हिंमत होते कारण त्यांना प्रत्युत्तर देणारा हिंदुसमाज संपत चालला आहे. एक महाराष्ट्राचा मंत्री जाहीरपणे म्हणतो की संभाजीमहाराज धर्मवीर नव्हते. महाराष्ट्रातील किती सामान्य माणसं पेटून उठली? कशाला करायची शिवजयंती साजरी? अफझलखान शिवाजीमहाराजांवर चाल करून आलाच नव्हता, तो इकडे त्यांच्या राज्याच्या विस्तारासाठी आला होता, असे जाणते राजे म्हणतात ! किती माणसं चिडली? नुसत्या शिवजयंत्या साजऱ्या करायच्या ! गावोगावी पुतळे ! काय उपयोग त्याचा ? एकाचंही रक्त खवळत नाही ! एकही माणूस पेटून उठत नाही! असं विधानसभेत जाहीरपणे म्हणणाऱ्या राजकारण्यांना आम्ही एकही मत न देता गाढून टाकत नाही. पुन्हापुन्हा निवडून येतात ! कशाला शिवजयंत्या साजऱ्या करायच्या ? माझं असं स्पष्ट मत आहे की भारतीय शिक्षण पद्धतीचा ज्ञानी होण्याशी काहीही संबंध नाही. इतके जरा सुशिक्षित लोक आहेत तर त्यांना या सगळ्या आरोपांना का उत्तर देता आलं नाही ? संभाजीमहाराज धर्मवीर नव्हते असं म्हणणाऱ्याला तेरा कोटी लोक का उत्तर देऊ शकत नाहीत ? स्वराज्याची स्थापना शिवाजीमहाराजांनी केलीच नाही, ते निधर्मी होते, स्वराज्यरक्षक होते, असा सभागृहात उभं राहून बोललं जातं आणि ती माणसं आपण पुन्हापुन्हा निवडून देतो. मग कशाला शिवजयंत्या साजऱ्या करायच्या? कशाला इथे जमायचं आणि शिवाजीमहाराजांच्या काळातील गोष्टी करायच्या? असा जरा निर्बुद्ध आणि मुर्दाड समाज असेल तर त्यांच्यावर आशा लोकांनीच राज्य केले पाहिजे! आपली तीच लायकी आहे ! हजारो लाखों रुपयांचे भ्रष्टाचार करणारी माणसं जर आपण पुन्हापुन्हा निवडून देणार असू, आपल्या महापुरुषांचा जाहीरपणे आणि बिनधास्तपणे अपमान करणाऱ्यांना आपण पुन्हापुन्हा निवडून देत असू, ज्ञानेश्वरमाउलींपासून, समर्थ रामदासांपासून, नामदेवांपासून, तुकाराममहाराजांसारख्या महापुरुषांचा अपमान करणारी माणसं आम्ही सातत्याने निवडून देत असू, तर शिवाजीचं नाव घेण्याची आपली प्राज्ञा, योग्यता आहे का ? शिवाजीने हे शिकवलं आम्हाला की संतांचा अपमान करा? कोणते चित्र बघत आपण मोठे झालो? एक साधा लंगोट नेसलेला बैरागी, संत, एक संन्यासी बसला आहे खडकावर, छत्रपतींच्या सिंहासनावर आरूढ झालेला एक राजा तेथे उभा आहे. काय चित्र आहे ? सिंहासनाधीश, छत्रपती, स्वराज्यरक्षक, धर्मवीर, हिंदवीस्वराज्यसंस्थापक उभा आहे, आणि बसलाय कोण ? ज्याच्याकडे यातील कुठलीही उपाधी नाही, तो संत, तो बैरागी बसलाय आणि राजा उभा आहे ! असे चित्र बघत आमची पिढी मोठी झाली. समर्थ रामदास बसलेत आणि छत्रपती शिवाजीमहाराज अतिशय नम्रपणे त्यांच्यासमोर उभे आहेत! या एका चित्रात शिवाजी कळतो ! राजा कसा असावा ! आपल्या देशातील, आपल्या राज्यातील प्रत्येक संतांचा अत्यंत सन्मान करणारा राजा आहे ! म्हणून तो शिवाजी आहे ! मग आपण शिकलो काय ? काहीही शिकलो नाही ! आम्ही जाहीरपणे टिंगलटवाळी करतो. ज्ञानेश्वरमाउलींची टिंगलटवाळी, समर्थ रामदासांची टिंगलटवाळी, तुकाराममहाराजांची टिंगलटवाळी, नामदेवमहाराजांची टिंगलटवाळी, सावरकरांची टिंगलटवाळी, लोकमान्य टिळकांची टिंगलटवाळी, महापुरुषांची टिंगलटवाळी ! हेच शिकवलं का शिवाजीमहाराजांनी? काय शिकवलं शिवाजीमहाराजांनी ? शत्रूची सून सन्मान करून परत पाठवली, हे शिवाजीमहाराज आहेत ना? एकातरी राजकीय पक्षाला

नैतिक अधिकार आहे का शिवजयंती साजरी करण्याचा? नुसता राजकारणापुरता शिवाजी वापरला जातो. अशा सगळ्यांना आपण परतपरत निवडून देतो, लाखांच्या मतांनी! मग आपल्याला तरी अधिकार आहे का?

साधी दोन तत्त्वं होती, सुईच्या टोकाएवढीपण स्वराज्याची जमीन मी कोणाला देणार नाही. त्यासाठी माझा प्राण गेला तरी चालेल. हे पहिलं तत्त्व ! स्वातंत्र्य मिळाल्यावर आम्ही काय केलं ? पहिल्या चीनच्या युद्धात एवढी जमीन आम्ही चीनच्या घशात घातली, कारण आम्ही शिवाजी अंमलात आणला नाही. शिवाजीमहाराजांच्या राज्यातील कुठल्याही नेमणुका, अगदी शिपायांपासून ते सरसेनापतीपर्यंत, या फक्त आणि फक्त कर्तृत्वावर अवलंबून असतील ! एकही नेमणूक घराणेशाहीवर नसेल, एकही नेमणूक जात-धर्मावर नसेल, ती फक्त आणि फक्त त्या माणसाचं कर्तृत्व बघून असेल ! आम्ही काय केलं ? जातीधर्मावर आरक्षण घेऊन आलो. एका विशिष्ट काळासाठी ती आंबेडकरांनी आणलेली होती. कायमस्वरूपी असं कुठेही म्हटलेलं नाही आंबेडकरसाहेबांनी! मी आंबेडकर संपूर्ण वाचलेले आहेत. एखाद्या आंबेडकरवाद्याला, अथवा रिपब्लिकन पार्टीवाल्याला जेवढे आंबेडकर माहीत नसतील एवढे आंबेडकर मला माहीत आहेत. पिढ्यान्‌पिढ्या मागासलेल्या या समाजाच्या एक ते दोन पिढ्यांना फक्त मदतीचा हात द्या. तुमच्याबरोबर खेचा. म्हणून ते दहा ते पंधरा वर्षांचे आरक्षण मागितलेले होते. त्यानंतर त्यांनी स्वकर्तृत्वावर पुढे जायचे आहे. शिवछत्रपतींच्या महाराष्ट्रात आपण कुठे घेऊन आलो समाजाला? जे सवर्ण आहेत, जे उच्चवर्णीय आहेत, ते म्हणताहेत आम्हाला आरक्षणात घ्या, आम्हाला 'बॅकवर्ड' म्हणा ! हे नाही शिकवलं शिवाजीमहाराजांनी! आरक्षण हा प्रकारच नव्हता स्वराज्यात! स्वकर्तृत्वावरती, मग तो कोणत्याही जातीधर्माचा असो, त्याच्या हातातील कौशल्य आणि स्वराज्यावरील निष्ठा या दोनच गोष्टी शिवाजीमहाराज बघायचे आणि मगच त्यांची नेमणूक व्हायची. आम्ही यातील एकही गोष्ट बघत नाही. निष्ठा बघत नाही आणि कौशल्य पण बघत नाही. कसं शिवाजीमहाराजांचं राज्य पुन्हा स्थापन होणार? होऊच शकत नाही ! उच्चवर्णीय मरमर अभ्यास करून ९२/९५ टक्के मार्क मिळवतो आणि एक जण ५० टक्के मार्क मिळवतो त्याला मेडिकलला ॲडमिशन मिळते, पण ९२/९५ टक्के मार्कवाला सवर्ण असल्यामुळे त्याला मिळत नाही. हे स्वराज्य आहे? हे शिवाजींनी शिकवलं ?

बोलताना सारखं सातत्याने बोलतात, 'शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र '! यातही शिवाजी बसत नाही ! या तिघांबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे. कोणी गैरअर्थ काढण्याचे कारण नाही. पण मी विचार करतो की हे शाहू कुणाच्या तत्त्वांवर जगले? शिवाजीमहाराजांच्या ! फुले आंबेडकर कोणाच्या तत्त्वांवर जगले ? शिवाजीमहाराजांच्या ! घटना बनविताना, संविधान बनविताना समोर आदर्श कोण होते? संविधानांचं पुस्तक बघितलं तर त्याच्यावर चित्रं कुणाची आहेत ? नवीन एडिशनमध्ये आता ती काढली आहेत. श्रीराम, श्रीकृष्ण, शिवाजीमहाराज यांची ती चित्रं आहेत. संविधान बनवताना कुणाचा आदर्श समोर ठेवलाय ? 'सेक्युलॅरिझम' शब्दाला जाहीरपणे विरोध केला आहे. 'सेक्युलॅरिझम' हा शब्द जर घटनेत आला तर 'अल्पसंख्य' हा शब्द राहू शकत नाही असं आंबेडकरांचं मत आहे. सेक्युलॅरिझम हा शब्द नको म्हणालेत लोक, का? तर अल्पसंख्याकांना दुखवून चालत नाही. तो नंतर घुसडलेला शब्द आहे. इंदिरा गांधींनी !

म्हणजे आपण आंबेडकरही धड फॉलो करीत नाही, शिवाजीही नाही. जयंत्या मात्र दणक्यात साजऱ्या करीत असतात. पुतळे गावोगावी उभे करीत असतात. शिवजयंतीला भगवा गुलाल उधळतात आणि आंबेडकर जयंतीला निळा ! हा कुठला रंग शोधून काढला ? आंबेडकरांनी कधी निळा रंग उधळला होता का ? रामदास आठवलेसाहेब आहेत त्यांनी निळी बासुंदी वाटली. अरेरे! आंबेडकर रडत असतील वरती ! त्यांचा तो नातू ! 'एम्. आय. एम्.' बरोबर युती केली ! एकदा आंबेडकरांचं पुस्तक वाचा – 'पाकिस्तान, द पार्टिशन ऑफ इंडिया'. इस्लामबद्दल आंबेडकरांची अत्यंत प्रखर मते आहेत. मुसलमान कधी राष्ट्रीय होऊ शकत नाही! माझं नाही, आंबेडकरांचं मत आहे ! इस्लाम जगाची विभागणी फक्त दोन भागात करतो. २५२ देशात नाही, जसे तुम्हीआम्ही म्हणतो ! इस्लाममध्ये दोनच भागात विभागणी आहे. दारुल-इस्लाम आणि दारुल-हरब ! हे आंबेडकरांचं मत आहे. सावरकरांचंही आहे, पण आंबेडकरांचं आहे हे फार महत्त्वाचं आहे. कारण पोंक्षे सावरकरांबद्दल बोलला की त्याला जातीचा भयंकर मुलामा दिला जातो. पण आंबेडकरसाहेबांच्या पुस्तकातील दाखला दिला की सर्वांची तोंडं बंद होतात. 'सेक्युलॅरिझम' म्हणजे धर्माची लुडबूड रोजच्या व्यवहारात चालणार नाही, त्याला म्हणतात सेक्युलॅरिझम. मराठीमध्ये इहवाद ! हिंदुधर्म नेमकं हेच शिकवतो ! रोजच्या व्यवहारात ज्याची लुडबुड चालत नाही असा हा पृथ्वीतलावरील एकच धर्म आहे.

मुळात धर्म एकच आहे, बाकी सगळ्या धर्मसंस्था आहेत म्हणून त्यांना संस्थापक आहेत. म्हणून त्यांची दीड-दोन हजार वर्षांपूर्वी स्थापना आहे. म्हणून तिकडे प्रेषित येतो. डायरेक्ट अल्लाशी कॉन्टॅक्ट नाही करू शकत ! मध्ये पैगंबरसाहेब आहेत! डायरेक्ट 'गॉड'शी तुम्ही कॉन्टॅक्ट नाही करू शकत. मध्ये येशू ख्रिस्तसाहेब आहेत. हिंदुधर्मात ही भानगड नाही. मध्ये शंकराचार्य नाहीत. डायरेक्ट रामाशी बोलतो, गणपतीशी बोलतो, 'पोरीला पास कर माझ्या!' आमची

गाडी व्हाया नाही. समर्थांच्या थ्रू, ज्ञानेश्वरांच्या थ्रू, तुकारामांच्या थ्रू नाही जावं लागत. सामान्यांतला सामान्य, तळागाळातला माणूस डायरेक्ट विठ्ठलाशी बोलू शकतो. हे हिंदुधर्माचं सौंदर्य आहे.

पहिला मनुष्यप्राणी पृथ्वीतलावर जन्माला आला तेथे मनुष्यधर्माची निर्मिती झाली. त्याला निसर्गाने दिलेल्या गुणधर्माला धर्म म्हणतात. धर्म म्हणजे इंग्लिशमधला 'रिलिजन' नाही. 'रिलिजन'मध्ये सर्वव्यापी अर्थ व्यक्त होत नाही. तो 'धर्म' शब्दात होतो. धर्म म्हणजे निसर्गाने प्रत्येक वस्तूला दिलेला गुणधर्म! म्हणून निधर्मी काही नाही ! नदीला धर्म आहे, वृक्षाला धर्म आहे, डोंगराला धर्म आहे! अग्नीला धर्म आहे ! निधर्मी काहीच नाही. दगडाचा धर्म काय ? तो स्वत:होऊन हालत नाही. लाखो वर्षं झाली तरी तो मान वर करून विचारत नाही की मला का हलवले नाही! नदीचा धर्म काय? जगातील कोणताही अडथळा उभा करा, त्यावर मात करून ती समुद्राला मिळणारच! अग्नीचा धर्म काय? जवळ गेलात तर उब मिळते, फार जवळ गेलात तर जळून खाक होते, तेथे आरक्षण चालत नाही! मनुष्याला गुणधर्म दिला आहे की दुसऱ्याशी प्रेमानं आणि माणुसकीनं वागणं ! त्या माणुसकी धर्माचं दुसरं नाव हिंदुधर्म आहे ! म्हणून हिंदुधर्माला संस्थापक नाही. श्रीराम, श्रीकृष्ण, शंकराचार्य यांनी हिंदुधर्माची स्थापना केली का ? नाही! ते जन्माला येण्याआधी हिंदुधर्म नव्हता का ? होता! मनुष्य धर्माचं दुसरं नाव हिंदुधर्म आहे. आमच्या 'डीएनए'मध्येच दुसऱ्या सजीवाशी प्रेमाने वागणं आहे. असा जो जो वागतो तो हिंदू आहे. शिवाजी या धर्मात जन्मलाय म्हणून तो सर्वांशी, माणसांशी, वनस्पतींशी, प्राण्यांशी प्रेमाने वागलाय!

त्याच्यावर जिजाबाईंनी संस्कार कुणाचे केले आहेत? श्रीराम आणि श्रीकृष्ण! नावातच श्री असलेली ही दोनच व्यक्तिमत्त्वं जगात आहेत. हा 'श्री' श्रीमान्-श्रीमती यातला नव्हे. तो नावातच आहे.

आत्यंतिक, पराकोटीचा आदर्श कसा असावा हे एक 'श्री' शिकवितो आणि कायकाय करू नये, कायकाय केलं असता तुमचा विनाश होईल हे दुसरा 'श्री' शिकवितो. जिजाबाईंनी फक्त हे दोन 'श्री' त्या छोटुश्या शिवबाला शिकवायला सुरुवात केली. म्हणून शाइस्तेखानाची बोटं छाटताना, अफझलखानाचा कोथळा काढताना त्या शिवबातील श्रीकृष्ण जागा होतो आणि शत्रूच्या सुनेची खणानारळाने ओटी भरून तिला परत पाठवताना शिवबातील श्रीराम जागा होतो!

हे का सांगतो आहे? आत्ता काय करायचं आहे २०२३ मध्ये? मघाशी ताई म्हणाल्या, शिवाजी परत जन्माला आला पाहिजे! तो कसा जन्माला येईल ? जर श्रीराम आणि श्रीकृष्ण आपल्या मुलांना त्या-त्या वयात शिकवले गेले तर कदाचित, मी 'कदाचित' म्हणतोय, कारण इतकं ते सोपं नाही ! एक चूक मी क्षमा मागून सुधारतो की शहाजीराजांनी स्वराज्याची संकल्पना जिजाबाईंच्या मनात आणली नाही. शहाजीराजांशी लग्न होण्याआधीपासून, बालपणापासूनच त्यांच्या मनात स्वराज्य होतं.

जिजाबाईंचं फार सुंदर चरित्र माझ्या वाचनात आलं. ती जन्माला आली, समज आली, तेव्हापासून हे अत्याचार पाहत मोठी झालेल्या त्या मुलीच्या मनात स्वराज्य असलं पाहिजे! बघा, नियतीची कशी योजना आहे! उगाच कोणा आंडूपांडूच्या पोटी शिवाजी जन्माला आलेला नाही. ते गर्भाशय साक्षात शिवाला जन्माला घालण्याच्या क्षमतेचे नको? आणि औरंगझेबाच्या दरबारात कुर्निसात करून उभ्या असलेल्या एका सरदाराच्या मनात तो अपमान खदखदतोय! दोनदा स्वराज्य स्थापनेचे त्याचे प्रयत्न अपयशी ठरलेले आहेत. अशा माणसाचं समज आल्यापासून स्वराज्याची संकल्पना वाढीला घालणाऱ्या एका मुलीशी लग्न झालंय! शिवाजी सामान्य माणूस नाही, तो परमेश्वराचा अंश आहे! माणूस कितीही विद्वान असू दे, बलवान असू दे, माणूस शिवचरित्रासारखे कार्य करू शकत नाही. साक्षात परमेश्वराने जन्म घेतल्याशिवाय हे असलं घडत नाही.

सातव्या शतकापासून हिंदुस्थानात अंधार झालाय, सूर्य मावळला आहे! तो मावळलेला सूर्य उगवायचे नावच घेत नाही! इतके अत्याचारांचे ढग आहेत! हुण, शक मग महंमद घोरी, मग एका पाठोपाठ मुसलमान शाह्या आल्या. सहाव्या-सातव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंत! एवढी शतके हा अंध:कार दूर व्हायचं नावच घेत नव्हता.

तुम्ही विचार करा, अफगाणिस्तान हे आपलं होतं, पूर्ण इस्लामीकरण झालं. अनेक राष्ट्रे मुसलमान झाली केवळ शंभर, दोनशे वर्षांच्या आक्रमणानंतर, पण सहाव्या-सातव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंत पाचपाच मुसलमान राजवटींची आक्रमणे होऊनसुद्धा त्याचं पूर्णपणे इस्लामिक राष्ट्रात रूपांतर का झालं नाही? कारण हिंदुधर्म हा मुळात निसर्गाने जन्माला घातलेला आहे. आणि जे जे निसर्ग जन्माला घालतो ते संपविण्याचे कर्तृत्व मनुष्यप्राण्यात नाही! आज युरोपमधील अनेक राष्ट्रं ही इस्लामिक होण्याच्या मार्गावर आहेत. आज भारतातही केरळ, पश्चिम बंगाल असे अनेक पॉकेट्स तयार झाले आहेत. हिंदुस्थानातील ४६ जिल्हे १०० टक्के मुस्लिमबहुल झालेले आहेत. तरीही मला भीती वाटत नाही. कारण मला इतिहास माहीत आहे! निसर्गाचा गुणधर्म तुम्ही संपवू शकत नाही ! कोणीही कितीही आक्रमणे केली तरी माणुसकीचा धर्म, हिंदुधर्म नष्ट नाही करू शकत! म्हणून सात-आठशे वर्षांचा अंध:कार संपविणारा सूर्य उगवतो तो हिंदुधर्मात उगवतो. त्याचं नाव शिवाजी आहे!

इस्लाम हा एक शांतताप्रिय धर्म आहे असं आपल्याला एअर-कंडिशनमध्ये बसून काही लोक सांगतात. 'मजहब नही सिखाता...'

असली काहीतरी फालतू गाणी लावतात. कुठलेही धर्मग्रंथ चुकीची शिकवण देत नाहीत असे म्हणतात.

जर आपण हिंदुस्थानचा इतिहास पाहिलात तर सगळे चांगले लोक हिंदुधर्मात कसेकाय जन्माला आले? श्रीराम, श्रीकृष्ण, अर्जुन, शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज, शाहू-फुले-आंबेडकर हे सगळे हिंदुधर्मातच कसे जन्मले? आंबेडकर हिंदुधर्म सोडून त्याच्याच दुसऱ्या शाखेत गेले, त्यांनी इस्लामचा किंवा ख्रिश्चन धर्माचा स्वीकार नाही केला! उपचारपद्धती, कर्मकांड बदललं, जे बुद्धाला अभिप्रेत आहे. पण बुद्ध हिंदूच आहे ना! तो इथूनच आलेला आहे. एक क्षत्रिय हिंदू राजा, तो जंगलात गेला, त्याला साक्षात्कार झाला आणि त्याने सर्वस्वाचा त्याग केला. आणि त्याने स्वत:ची एक फिलॉसॉफी बनविली, 'बुद्धिझम', जगातला सर्वोत्तम 'इझम' आहे तो! पण तो धर्म निसर्गाच्या धर्माशी फारकत घेऊन उभा आहे का ? नाही! आमचीच शाखा आहे ती! शिख, जैन या आमच्याच शाखा आहेत! उपचार पद्धती बदलतात.

काही लोक भटजी बोलावून लग्न लावतात. मी मला सोयीचे होते म्हणून रजिस्टर लग्न केले. हल्ली ज्ञानप्रबोधिनीचे लोक लग्न लावतात. म्हणजे हे काय वेगळे धर्म झाले ? नाही ना? हेचतर हिंदुधर्माचे सौंदर्य आहे! हे असं करायची तुम्हाला परवानगी आहे. अशी इस्लाममध्ये, ख्रिश्चन धर्मात परवानगी आहे का? नाही! म्हणून सलमानखानला कुठलाही मौलवी मुसलमान मानत नाही. कारण त्याच्या घरात दीड दिवसाचा गणपती बसतो! सिनेमात काम करणारे कलाकार, संगीत हे इस्लामला मान्य नाही! गंमत बघा, संगीत मान्य नाही, पण मशिदीवर स्पीकर लाऊन गातात ते मान्य आहे! आपल्याला मूर्ख बनविणं सोपं आहे, कारण आपण अज्ञानी आहोत.

आपण सामान्य आहोत. कुठली सिस्टिम बदलणे आपल्या हातात नाही. पण जिजाबाईंनी शिवाजीला कुठल्या शाळेत घातलं नव्हतं! ती असं म्हणाली नाही की गुरूंच्या, दादोजी कोंडदेवांच्या हाती बाळ सोपविलं की ते बघतील! आजच्या आया जे कर्तव्य म्हणून करतात, खाणेपिणे-कपडालत्ता बघणे, तेवढंच जिजाबाईंनी केलं असतं तर शिवाजी झाला असता का? नसता झाला! तिने वेळात वेळ काढला आणि त्याला श्रीराम आणि श्रीकृष्ण शिकवला. श्रीकृष्णाची युद्धनीती शिकविली. 'जो जो अधर्माच्या बाजूने उभा राहील त्याला संपवणे हाच तुझा धर्म आहे, शिवबा!' जो धर्म श्रीकृष्णाने अर्जुनाला शिकविला. युद्धशास्त्रात बसत नाही अशा मार्गाने कर्णाला मारायला भाग पाडलं! त्या काळी समोरासमोर युद्ध करायचं आणि नि:शस्त्र आणि सशस्त्र असे युद्ध करू शकत नव्हते. चाक अडकलंय म्हणून शस्त्र ठेऊन कर्ण खाली उतरलाय! अर्जुन म्हणाला, मला नाही मारता येत. हे क्षत्रिय धर्माच्या विरुद्ध आहे. तेव्हा श्रीकृष्ण म्हणाला की क्षत्रिय धर्माच्याही पलीकडे एक धर्म आहे. तो आहे माणूसधर्म. त्या धर्माला बगल देऊन हा कर्ण अधर्मी दुर्योधनाला साथ देतोय! त्यामुळे त्याला संपविणे हाच तुझा धर्म आहे. हे सगळं जिजाबाईंनी शिवाजीमहाराजांना शिकवलं. भेटायला आलेल्या अफझलखानाने अट घातली होती की एकटे, नि:शस्त्र भेटायला या. जर जिजाबाईंनी आदर्श केवळ श्रीराम शिकवला असता, श्रीकृष्ण शिकवला नसता, तर कदाचित महाराज एकटे आणि नि:शस्त्र गेले असते. पण श्रीकृष्ण मनावर बिंबवलेला असल्यामुळे त्यांनी मी नि:शस्त्र आहे असा भास निर्माण केला. ते नि:शस्त्र कधीच नव्हते! सगळं पद्धतशीर योजना करून, सगळी फौज सज्ज ठेऊन, कधी दगाफटका होईल माहीत नाही, शत्रूला कसं ओळखायचं? शत्रूची जात कोणती आहे? शत्रूला भाषा कोणती समजते? सगळं ज्ञान होतं! जिजाबाईंनी दोन 'श्री' शिकवले होते म्हणून शिवाजीमहाराजांनी दाखवलं फक्त की मी एकटा, नि:शस्त्र आलोय. आणि मग त्या वज्रमुठीतील शस्त्र बाहेर काढलं आणि त्याचा कोथळा काढला. तो वार करणार याची १००१ टक्के खात्री होती म्हणूनच ते चिलखत घालून गेले होते.

म्हणून म्हणतो की आम्हाला २०२३ साली दुसरं काही करायचं नाही, फक्त या बछड्यांना श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या गोष्टी सांगायच्या आहेत. ते ऐकूदेत, न ऐकूदेत, सतत त्यांच्यावर तो मारा सुरू ठेवा! 'लहान मूल म्हणजे मातीचा गोळा असतो. जसा आकार द्यावा तशी मूर्ती बनते.' वसंत कानेटकरांच्या 'रायगडाला जेव्हा जाग येते' मधील वाक्य आहे हे. मातीचा गोळा आयांच्या हातात असतो. वडील बाहेर पैसे कमवायला गेलेले असतात. पुनर्जन्माच्या वेदना सहन करून त्या बाईनेच तो गोळा जन्माला घातलेला असतो. तो गोळा मोठा होतो. त्याला आकार येतो. त्याच्यावर संस्कार करायचे असतात. ती मूर्ती कशी घडवायची हे फक्त आईनं ठरवायचं असतं. ९० टक्के मूर्ती आईच घडवते. बाप फक्त साधने आणून देतो. आणि घराघरातील या श्रीराम-श्रीकृष्णाच्या गोष्टी बंद झाल्या तेव्हापासून संस्कृतीचा विचका व्हायला सुरुवात झाली. ज्या दिवशी आजी-आजोबा वृद्धाश्रमात गेले त्या दिवशी या गोष्टी बंद झाल्या. ज्या दिवशी १५-२० माणसांचं कुटुंब फुटलं, 'हम दो-हमारे दो' असं कुटुंब झालं, नवराबायको दोघंही नोकरी करायला लागले, त्या दिवशी घरातले श्रीराम-श्रीकृष्ण पळून गेले. त्यांच्याबरोबर सगळे संस्कारही गेले, त्यांच्याबरोबर शिवाजी जन्माला येण्याची एक टक्का शक्यता होती तीही संपली! आणि मग माझ्यासारखे सगळे 'शरद' जन्माला आले.

शिवाजीमहाराजांवर त्यांच्या आईने काय संस्कार केले ते महत्त्वाचं आहे. त्याचा काळाशी काही संबंध नाही. उलट आता तुमच्याकडे संसाधने भरपूर आहेत. जिजाबाईंकडे काही नव्हतं! फारशी पुस्तकं पण उपलब्ध नसतील. काय वाटलं असेल त्या बाईला? तेरा-चौदा

वर्षांच्या मुलाला हातात तलवार घेऊन घोड्यावर रपेट करायला शिकवत होती. काय वाटलं असेल? कधीकधी, खेळताखेळता तलवार लागून पोर मेलं, असंपण होऊ शकतं ना? केवढी मुलं ती? सोळाव्या वर्षी पहिला गड जिंकला ! मिसरूडही फुटलेली नसेल! अशा वयाच्या मुलाला एक आई लढायला पाठवते. केवढा हृदयावर दगड ठेऊन पाठविला असेल! हल्लीच्या आया मैदानी खेळ खेळायलाही पाठवत नाहीत! कॉम्प्युटरवर खेळतात पोरं फुटबॉल आणि क्रिकेट. कशी दिसतात ती! यांना पाहून वाटतच नाही की हे काही आयुष्यात करतील! जास्तीतजास्त झेंडा रोवणार म्हणजे कॉम्प्युटर इंजिनीअर! त्याचा काही उपयोग नाही! अशी शिवजयंती साजरी झाली पाहिजे, की भाषणे नाही झाली तरी चालतील, पण घराघरात शिवचरित्र, रामायण, वाचलं गेलं पाहिजे! कसा होता राजा? रावणाबरोबर लढायला कुणाला घेऊन गेला? कोणी उच्चवर्णीय होता? सगळे दलित वर्गातले होते. आणि कुणाबरोबर लढाई? रावणाबरोबर! सामान्य नाही तो! शंकराला ज्याने प्रसन्न करून घेतलाय असा आहे तो! मारुती नमस्काराला आला तेव्हा त्याला मिठी मारलीय! एकाएका वानराला रामाने मिठी मारली आहे! न्युज चॅनेलवर आपण पाहतो. वयाने मोठे पुढारी लहान पोरांसमोर लाचारी करतात. शूद्रांना बरोबर घेऊन राम लढलेत! हे शिकवलं जिजाबाईंनी ! म्हणून शिवाजी लहानातल्या लहान मावळ्याबरोबर बसत होता. त्याची भाकर खात होता. म्हणून प्रत्येक सामान्यातल्या सामान्य माणसाला राजा माझा वाटत होता. असा हा शिवाजीचा विचार घेऊन आपल्याला पुढे जायला पाहिजे. नुसतंच म्हणत राहायचं की शिवाजी जन्माला आला पाहिजे! कधीच येणार नाही! का त्याने यावे? का श्रीकृष्णाने पुन्हापुन्हा जन्म घ्यावा? आपल्या आक्रोशामध्ये द्रौपदीची आर्तता नाही. तिने हाक मारली ती १०० टक्के विश्वास ठेऊन मारली आहे. आपण ॲलोपाथीच्याही गोळ्या घेतो, होमिओपाथीच्या गोळ्या घेतो आणि आयुर्वेदिकही! त्यातच दोन यज्ञ पण करून टाकतो. ज्योतिषाकडे जाऊन दोन अंगठ्याही घालतो. विश्वासच नाही कोणावर!

आपण मला येथे बोलावलंत, या वास्तूत आल्यावर प्रसन्न वाटतं, हे मंत्रोच्चार, भगव्या ध्वजाची पूजा हे माझ्या आयुष्यात मी पहिल्यांदाच पाहिलं! सगळ्या संतांनी, शिवाजीमहाराजांनी हातात भगवा का घेतला असेल? सूर्योदय, सूर्यास्ताच्या वेळी आकाशाचा रंग भगवा होतो. यज्ञकुंडात ज्या ज्वाळा भडकतात त्याचा रंग भगवा असतो. भगव्याचे सामर्थ्य आहुती देण्यात आहे. भोगण्यात नाही! स्वाहा म्हणण्यात सामर्थ्य आहे! जेथे जेथे स्वाहा आहे तेथे तेथे भगवा आहे! त्यागात सामर्थ्य आहे. वैराग्याचं लक्षण आहे. आणि आमचे सगळे राजकारणी भगवा हातात घेऊन भोगभोग भोगतात! म्हणून भगवा त्यांना फळत नाही, आणि मग जातं सगळं हातातून निघून, कारण भगव्याशी इमान नाही! भगवा पेलण्याचे सामर्थ्य असेल तरच भगवा डोक्यावर चढवा! मनगटात भगवा पेलण्याचं सामर्थ्य असेल तर भगवा हातात घ्या! भगवा फेटा बांधा!.. जयहिंद, जय महाराष्ट्र !

या नंतर आभारप्रदर्शन आणि वरयाचना पठण होऊन सभेची सांगता झाली.



# डेरवण यूथ गेम्स २०२३ ला उत्स्फूर्त प्रतिसाद !




*उद्घाटन समारंभात सभामंचावर (डावीकडून): डॉ. नेताजी पाटील, सौ. शरयू यशवंतराव, डॉ. नीलिमा देशपांडे, श्री. कमलेश जोशी, श्री. श्रीकांत पराडकर आणि श्री. अजित गाळवणकर*

छत्रपती श्री शिवजयंतीच्या निमित्ताने श्रीक्षेत्र डेरवण येथे श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट (एसव्हीजेसीटी)च्या वतीने क्रीडासंकुलात 'डेरवण यूथ गेम्स' या नावाने प्रतिवर्षी एक क्रीडामहोत्सव भव्य प्रमाणात आयोजित केला जातो. या वर्षी नवव्या क्रीडा महोत्सवाचे आयोजन दि. ३ मार्च ते १० मार्च २०२३ या कालावधीत करण्यात आले होते. या वर्षी 'निर्धार आणि अभिमान' ही या महोत्सवाची संकल्पना होती. या क्रीडा महोत्सवात संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो खेळाडू सहभागी होतात. कोकणातील हा क्रीडा महोत्सव 'कोकण ऑलिम्पिक' म्हणून ओळखला जातो. संपूर्ण महाराष्ट्रात विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंना या क्रीडा महोत्सवाची प्रतीक्षा असते.

डेरवण क्रीडा महोत्सवात ॲथलेटिक्स, फुटबॉल, टेबल टेनिस, बास्केटबॉल, जिम्नॅस्टिक्स, योगा, खोखो, कबड्डी, जलतरण, लंगडी, मल्लखांब, शूटिंग, आर्चरी, बॅडमिंटन, व्हॉलिबॉल, वॉल क्लाइंबिंग, कॅरम आणि बुद्धिबळ अशा १८ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. या वर्षी 'ॲरोबिक्स'चा समावेशही करण्यात आला. ४०० मीटर आणि आठ लेनचा कोकणातील एकमेव असा सिंथेटिक रनिंग ट्रॅक हे एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलाचे भूषण. पहिला काही प्रमाणात खराब झालेला ट्रॅक उखडून तो या वर्षी संपूर्णपणे नव्याने करण्यात आला.

## महोत्सवाचे शानदार उद्घाटन

दि. ३ मार्च २०२३ रोजी सकाळी शिवसमर्थगड येथे श्री. उदयराज कळंबे, अध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा शारीरिक शिक्षण शिक्षक असोसिएशन, यांच्या हस्ते क्रीडामशाल प्रज्वलित करून या क्रीडा महोत्सवाला प्रारंभ झाला. एसव्हीजेसीटी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील क्रीडापटूंनी मशाल क्रीडासंकुलात आणल्यावर प्रमुख पाहुण्या, पतियाला येथील नेताजी सुभाष राष्ट्रीय क्रीडा संस्थेतील सिनियर ॲथलेटिक्स प्रशिक्षक मा. डॉ. नीलिमा देशपांडे यांनी क्रीडाध्वज उभारला आणि राज्यगीताचे गायन झाले.

स्पर्धेसाठी आलेले खेळाडू आणि शालेय विद्यार्थी यांनी दिमाखदार संचलन केल्यावर मा. डॉ. नीलिमा देशपांडे यांनी क्रीडांगणावरील क्रीडाज्योत प्रज्वलित केली. श्रेया भागवत या विद्यार्थिनीने खेळाडूंना क्रीडाशपथ दिल्यावर पाहुणे आणि अन्य सन्माननीय अतिथी व्यासपीठावर स्थानापन्न झाले. या नंतर पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उद्योजक श्री. कमलेश अशोक जोशी, बीकेएल वालावलकर हॉस्पिटलचे रेडियोलॉजिस्ट डॉ. नेताजी पाटील, स्पोर्ट्स डायरेक्टर श्रीकांत पराडकर, शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव उपस्थित होते.

क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात क्रीडासंकुलातील विविध क्रीडा सुविधांची माहिती या वेळी दिली. डेरवण यूथ गेम्समध्ये सहा सांघिक, बारा वैयक्तिक क्रीडाप्रकारांच्या स्पर्धा होणार आहेत. पाच वयोगटात होणाऱ्या या क्रीडा महोत्सवात साडेचार हजारांवर खेळाडू सहभागी होतील असा अंदाज आहे. सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या डेरवण क्रीडासंकुलातील हा क्रीडा महोत्सव खेळाडूंना एक नवी ऊर्जा देऊन जातो. अभ्यास, आरोग्य व खेळ या तीनही गोष्टी जीवनात आवश्यक असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. शरयू यशवंतराव यांनी मोबाईल वापरण्याचे दुष्परिणाम सांगत मैदानावर खेळण्याचे अनेक फायदे सांगितले.



विद्यार्थी आणि खेळाडूंचे संचलन



डॉ. नीलिमा देशपंडे यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलन

डॉ. नेताजी पाटील म्हणाले की, 'डेरवण क्रीडा महोत्सवाचे यंदाचे नववे वर्ष आहे. हे स्पर्धेचे युग आहे. चांगल्या गोष्टींची नितांत गरज आहे. खेळाडूंनी खेळण्याचा पुरेपूर आनंद घ्यावा. खेळात आपण पहिले वा दुसरे येतो की नाही याला फारसे महत्त्व नाही. क्रीडांगण आता रणांगण झाले आहे. खेळाच्या माध्यमातून आपणात संयम, स्वयंशिस्त, जय-पराजय पचवण्याची क्षमता निर्माण होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खेळ आवर्जून खेळावा असे आवाहन केले.

उद्योजक कमलेश जोशी म्हणाले की, 'शारीरिक तंदुरुस्तीसाठी व्यायाम आणि खेळ या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. आपण शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असलो तरच व्यावहारिक जगात आपण आपले कार्य व्यवस्थितरीत्या पार पाडू शकतो. लहान वयातच खेळाची आवड निर्माण झाली पाहिजे. त्यामुळे डेरवण यूथ गेम्सचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. शिवजयंतीनिमित्ताने होणारा हा क्रीडामहोत्सव आता सर्वदूर पसरला आहे. राज्यातील विविध जिल्ह्यातील खेळाडू यात सहभाग घेतात हे विशेष. खेळाडूंनी आपल्या क्रीडाप्रकारात 'फोकस' राहावे म्हणजे यश हमखास मिळेल असे त्यांनी सांगितले.

उद्घाटनपर भाषणात डॉ. नीलिमा देशपांडे यांनी कोकण ऑलिम्पिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डेरवण यूथ गेम्सच्या जय्यत तयारीचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना खेळात करिअर करण्याच्या दृष्टीने अनेक संधी असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण असो की खेळ आपण शंभर टक्के योगदान दिले तर हमखास यश मिळते. तसेच जी गोष्टी आपण करत आहोत त्याचा आनंद घ्या असे त्यांनी या वेळी सांगितले. डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे क्रीडासंकुल हे देशातील आधुनिक क्रीडासंकुल आहे. एकाच छताखाली क्रीडा, शिक्षण व वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा असलेले हे देशातील उत्कृष्ट ठिकाण आहे. क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याच्या अनेक संधी आता उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच खेळातही करिअर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत असे प्रतिपादन करून त्यांनी 'डेरवण यूथ गेम्स'चे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले.

एसव्हीजेसीटी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाने समारंभाची सांगता झाली. या वेळी डॉ. नीलिमा देशपांडे यांच्या हस्ते ऑलिम्पिक प्रदर्शनाचे देखील उद्घाटन करण्यात आले.

आठवडाभर चाललेल्या या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला. वैयक्तिक खेळांमध्ये एकूण १६८२ खेळाडूंनी (वेगवेगळ्या वयोगटात आणि क्रीडाप्रकारात) २९७६ स्पर्धांमध्ये भाग घेतला. पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग आणि अर्थातच रत्नागिरी जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. नाशिक, ठाणे, मुंबई




श्री. कमलेश जोशी यांच्या हस्ते डॉ. नीलिमा देशपांडे यांचे स्वागत



श्री. श्रीकांत पराडकर प्रास्ताविक करताना



शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव



डॉ. नेताजी पाटील

यांचाही प्रतिसाद समाधानकारक होता. मैदानी खेळात सर्वाधिक खेळाडूंनी आपला कस अजमावला. त्याचबरोबर जिम्नॅस्टिक, मल्लखांब, धनुर्विद्या, बॅडमिंटन, जलतरण आणि नेमबाजीतही उत्तम सहभाग होता. २७४ संघांनी सांघिक क्रीडाप्रकारात आपले कौशल्य दाखविले. यामध्ये २०५८ खेळाडू सहभागी होते. कबड्डी, खोखो, लंगडी या क्रीडाप्रकारात नेहमीप्रमाणेच जोरदार चुरस होती, पण या वर्षी कोकणात फारशा प्रचलित नसलेल्या बास्केटबॉललाही अनपक्षितपणे मोठा प्रतिसाद मिळाला. एकंदरीत या वर्षी या स्पर्धेत ३७४० खेळाडू सहभागी झाले आणि त्यांनी ५४३६ स्पर्धांत सहभाग नोंदविला. खेळाडूंमध्ये मुलींचा सहभाग ३५ टक्के एवढा होता आणि ट्रस्टच्या धोरणाप्रमाणे तो अधिकाधिक वाढावा यासाठी उत्तेजन देण्यात येत आहे. यशस्वी खेळाडूंना ५२ चषक, ११०० पदके आणि १६ लाख रुपयांची रोख बक्षिसे वाटण्यात आली.

या क्रीडास्पर्धा यशस्वी होण्यासाठी सुमारे अडीचशेपेक्षा जास्त स्वयंसेवक अहोरात्र कष्टत होते. आपल्या नोकरी-व्यवसायातून सवड काढून आलेल्या या स्वयंसेवकांनी आपल्या तत्पर आणि सौजन्यपूर्ण सेवेने सहभागी खेळाडू, त्यांचे पालक यांची शाबासकी मिळवली. अशी उत्तम व्यवस्था, असे नियोजन, आणि असे स्नेहपूर्ण वातावरण अन्यत्र कोठेही पाहायला मिळत नाही असेच सर्व जण आवर्जून सांगत होते. ऑन-लाइन नावनोंदणी, भोजनव्यवस्था, निवासव्यवस्था, वाहतूकव्यवस्था, स्पर्धेचे वेळापत्रक, देखणे चषक, ढाली, पदके आणि भरघोस रोख बक्षिसे यामुळे ही स्पर्धा क्रीडाक्षेत्रात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करीत आहे.

## क्रीडा स्पर्धेचा समारोप

सर्व काही वेळापत्रकाप्रमाणे निर्विघ्नपणे पार पडल्यावर शिवजयंतीच्या दिवशी दि. १० मार्च २०२३ रोजी स्पर्धेचा समारोप सायंकाळी ठीक ५.०० वाजता आंतरराष्ट्रीय ख्यातीचे, शिवछत्रपती पारितोषिक विजेते नेमबाज श्री. रमेश कुसळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. प्रथम एसव्हीजेसीटीचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते श्री. रमेश कुसळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विकासराव वालावलकर यांच्या हस्ते, दरवर्षी सातत्याने या स्पर्धेच्या यशस्वितेसाठी झटणारे क्रीडा शिक्षक आणि जिल्हा खोखो असोसिएशनचे पदाधिकारी श्री. संदीप तावडे यांचाही सन्मान करण्यात आला.



श्री. कमलेश जोशी आपले विचार व्यक्त करताना



डॉ. नीलिमा देशपांडे - अध्यक्षीय भाषण




*समारोप समारंभात सभामंचावर डावीकडून: सौ. शरयू यशवंतराव, सौ. कुसळे, श्री. रमेश कुसळे, श्री. विकासराव वालावलकर आणि श्री. अजित गाळवणकर*

एसव्हीजेसीटीचे क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर यांनी डेरवण यूथ गेम्समध्ये पार पडलेल्या सर्व क्रीडा स्पर्धांचा आढावा घेतला. या वर्षी या क्रीडा महोत्सवात सुमारे ३७४० खेळाडू सहभागी झाले होते. वैयक्तिक क्रीडा प्रकारांत मुलींची संख्या गेल्या वर्षी ९३७ होती ती या वर्षी १२७० वर पोहोचली. तर महिलांचे संघ गेल्या वर्षी ३९ होते ते यंदा ५० झाले, अशी माहिती श्रीकांत पराडकर यांनी दिली. स्पर्धेच्या विशेष उपक्रमात म्हणजेच ऑलिम्पिक प्रदर्शनात यंदा बॅडमिंटनविषयी समग्र माहिती मांडण्यात आली. तेथेच मुलांसाठी मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. याचा मुलांनी भरभरून आनंद लूटला.

१०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारांतील अखेरच्या टप्प्यातील काही स्पर्धा समारोपाच्या वेळी पार पडल्या. या क्रीडा स्पर्धांत बक्षिसे मिळविणाऱ्या खेळाडूंना या वेळी श्री. कुसळे आणि श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या नंतर आपल्या भाषणात ट्रस्टचे मुख्य कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर म्हणाले की, 'मोठ्या आनंदात आणि जल्लोषात या क्रीडा स्पर्धा नेहमीप्रमाणे पार पडल्या. नवीन खेळ आणि त्यातील खेळाडूंना उत्तेजन हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. खोखो, कबड्डी या देशी खेळांबरोबरच लंगडी या खेळालाही येथे प्रोत्साहन दिले जाते. या वर्षी क्रीडासंकुलातील जुना ट्रॅक काढून टाकून धावण्याचा सिंथेटिक ट्रॅक नव्याने तयार करण्यात आला आहे. खेळांसाठी मूलभूत सुविधा या उत्तमोत्तम असाव्यात असा संस्थेचा प्रयत्न असतो. ऑलिम्पिकमध्ये आपण पदके मिळविण्याची अपेक्षा करतो. परंतु खेळाडूंसाठी दर्जेदार सुविधा किती उपलब्ध करून दिल्या? चांगले खेळाडू घडविण्यासाठी सर्वकाही सरकारनेच करावे अशी अपेक्षा न करता खासगी संस्थांनीही यासाठी पुढाकार घ्यायला हवा.'

प्रमुख पाहुणे श्री. रमेश कुसळे म्हणाले, 'प्रत्येक खेळाडूमध्ये चिकाटी, जिद्द आणि जिंकण्याची प्रबळ इच्छा असली पाहिजे.




*श्री. कुसळे यांचे स्वागत करताना श्री. विकासराव वालावलकर*



*श्री. संदीप तावडे यांचा श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते सन्मान*



*पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण*




*श्री. विकासराव वालावलकर आपले विचार व्यक्त करताना*

खेळाडूंनी खेळाचा आनंद घ्यावा, नेहमी सकारात्मक विचार करावा, मग तो कोणताही खेळ असू द्या. ग्रामीण भागामध्ये अनेक गुणवान खेळाडू आहेत. परंतु त्यांना आवश्यक त्या सुविधा मिळत नाहीत. डेरवणसारख्या ठिकाणी खेळांसाठी अशा आंतरराष्ट्रीय सुविधा उपलब्ध करून देणे ही फार मोठी गोष्ट आहे.'

पाहुण्यांच्या समारोपाच्या भाषणानंतर एसव्हीजेसीटीचा क्रीडाध्वज खाली उतरविण्यात येऊन २०२४ मध्ये होणाऱ्या डेरवण क्रीडा महोत्सवासाठी क्रीडासमितीचे सदस्य श्री. योगेश विचारे यांच्या हस्ते तो क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर यांच्या हाती सुपूर्द करण्यात आला. एसव्हीजेसीटी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी या वेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी आभार प्रदर्शन केले आणि मागील आठ दिवस गजबजून गेलेले मैदान हळूहळू मोकळे झाले.

शिवजयंती उत्सवाच्या सांगतेच्या निमित्ताने क्रीडासंकुलापासून शिवसमर्थगडापर्यंत मोठी शोभायात्रा काढण्यात आली होती. शरीराने थकलेले स्वयंसेवक मनाच्या उभारीने उत्साहात शिवछत्रपतींचा जयघोष करीत या मिरवणुकीत सामील झाले होते. आता प्रतीक्षा होती ती पुढील वर्षी दि. २१ ते २८ मार्च या काळात होणाऱ्या दहाव्या 'डेरवण यूथ गेम्स'ची !



*श्री. रमेश कुसळे – अध्यक्षीय भाषण*



*श्री. योगेश विचारे अध्यक्षांकडे क्रीडाध्वज सुपूर्द करताना*































PREM
17










0305
0239












TBALL
YMNASTICS

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com














मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०